# “गोंदिया तालुक्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकासात महिला आर्थिक विकास महामंडळाची भुमिका”

**(“The Role of Mahila Arthik Vikas Mahamandal In the Women’s Economic, Social and Entrepreneurial Development in Gondia Taluka”)**

## लघुशोध प्रबंध गोषवारा

**(Executive Summary of Minor Research Project)**

**रविंद्र चांगोजी मोहतुरे**
सहाय्यक प्राध्यापक (वाणिज्य विभाग)
न.मा.द महाविद्यालय, गोंदिया
rcmohture67@gmail.com

# Executive Summary of Minor Research Project

## (लघुशोध प्रबंध गोषवारा)

## "गोंदिया तालुक्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकासात महिला आर्थिक विकास महामंडळाची भुमिका"

महिला आर्थिक विकास महामंडळ ग्रामिण भागातील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून संघटीत करून बचत गटाच्या माध्यमाने केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करित असते. महामंडळाने महाराष्ट्रातील 12243 खेडयांमध्ये 57377 बचत गटाची बांधणी करून सात लाख महिलांना संघटित केले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाचे ग्रामिण महिलांच्या विकासात कार्य पाहता गोंदिया तालुक्यातील ग्रामीण महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकासात महिला आर्थिक विकास महामंडळाची भुमिका तपासून पाहण्याचा प्रयत्न प्रस्तुत लघु शोध प्रबंधाव्दारे करण्यात आला आहे.

प्रस्तुत लघु शोध प्रबंध खालील दिलेल्या सात प्रकरणांत समाविष्ट करण्यात आले आहे.

**प्रकरण – 1. प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणांत स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरच्या काळात महिलांच्या स्थिती बद्दल विवेचन करण्यात आले आहे. पुरूषप्रधान समाजव्यववस्थेने महिलांना सामाजीक व धार्मिक जोखडात बांधून ठेवल्यामुळे महिलांचा विकास होऊ शकला नाही. तरीपण देशाच्या आर्थिक विकासात महिलांचा सिंहाचा वाटा आहे. तरीपण तिला तिचे अधिकार आजपर्यंत मिळु शकले नाही. महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकास साध्य करण्याच्या दृष्टीने अनेक कायदयाची महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्र सरकारने ग्रामिण महिलांचा आर्थिक, सामाजीक व राजकीय सबलीकरणांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. प्रस्तुत प्रकरणांत महामंडळाचे स्थापनेपाठीमागील उद्देश कार्यप्रणाली महिला बचत गट व महिलांचे आर्थिक, सामाजीक व राजकीय सबलीकरण याची चर्चा केली आहे.

**प्रकरण –2 साहित्याचे पुनरावलोकन**

प्रस्तुत प्रकरणात महिला सशक्तीकरणाच्या संबंधीत पूर्वसंशोधनाचा आढावा संक्षिप्त स्वरूपात घेण्यात आला आहे. विसाव्या शतकात विकसीत आणि विकसनशील देशाच्या सामाजीक आर्थिक आणि राजकीय विकासांतर्गत "महिला सशक्तिकरण" महिलांचे कल्याण आणि "लैंगिक न्याय" प्रकाशझोतात आले. महिलांच्या हक्कासाठी चळवळ ही महत्वपूर्ण बाब बनली या संबंधाने विविध साहित्याचा अभ्यास करून संक्षीप्त विवेचन केले आहे.

**प्रकरण – 3 संशोधन पध्दती**

महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकासात महिला आर्थिक विकास महामंडळाची भुमिका हा संशोधनाचा अभ्यास विषय असून त्याअंतर्गत गोंदिया तालुक्यातील ग्रामिण क्षेत्रातील महिला आर्थिक विकास महामंडळाव्दारे निर्मित बचत गटाशी संबंधीत 25 गावांची निवड केली असून 25 गावांतून दोन बचत गट निवडून प्रत्येक बचत गटातून चार महिला अशा एकूण 50 बचत गटातील 200 महिलांची नमूना म्हणून निवड केली आहे. 200 महिलांकडून प्रश्नावलीच्या माध्यमाने प्राथमीक माहिती संकलीत करण्यात आली आहे तसेच दुय्यम तथ्य सामग्री ग्रंथ, जर्नल, बचत गटाशी संबंधीत प्रकाशित व अप्रकाशीत अहवालाव्दारे प्राप्त केली आहे.

**संशोधनाची उदिद्ष्टये –**

महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय समस्या जाणून घेण्यासाठी पूढिलप्रमाणे उद्दिष्टये निर्धारीत करण्यात आली.

1. महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकासात झालेला बदल तपासणे. 2. महिला आर्थिक विकास महामंडळाव्दारे कार्यान्वित विभिन्न योजनांची माहिती प्राप्त करणे 3. महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत विभिन्न योजनांचा महिलांना किती लाभ झाला याचे परिक्षण करणे. 4. महिला आर्थिक विकास महामंडळाचा उगम आणि विकास याचे अध्ययन करणे 5. महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत महिलांना मिळालेली सहायता पडताळून पाहणे.

**गृहित कृत्ये**

1. महिला आर्थिक विकास महामंडळामुळे महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय विकासावर अनुकूल परिणाम झाला आहे. 2. महिला आर्थिक विकास महामंडळामुळे महिलांचे रोजगार उत्पन्न आणि जीवनस्तर यांच्यावर सकारात्मक परिणाम झाला आहे. 3. महिलांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. महिलांमध्ये संघ भावना निर्माण झाली आहे. 4. महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे.

**प्रकरण – 4 महिला आर्थिक विकास महामंडळाचे महिला विषयक धोरण**

प्रस्तुत प्रकरणांत ग्रामिण महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय सबलीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाव्दारे केंद्र व राज्य सकरकारच्या विविध योजनांतर्गत बचत गटाची निर्मिती करून ग्रामिण महिलांना विविध प्रकारच्या योजना मार्फत शासकीय योजनांचा लाभ प्राप्त करून दिला जातो त्या धोरणासंबंधीची चर्चा प्रस्तुत प्रकरणांत केली आहे.

**प्रकरण –5 गोंदिया तालुक्यात महिला आर्थिक विकास महामंडळाची प्रगती**

प्रस्तुत प्रकरणात गोंदिया तालुक्याची भौगोलीक स्थितीवर चर्चा केली आहे. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाने गोंदिया तालुक्यातील ग्रामिण महिलांच्या सबलीकरणांसाठी, विविध योजनाअंतर्गत

बचत गटांची निर्मिती, निर्मित बचत गटात सम्मीलीत जात प्रवर्गानुसार महिलांची संख्या, बचत गटात सहभागी गरिबी रेखा खालील महिलांची संख्या, वर्ष 2010—11 ते 2014—15 कालावधीत बचत गटाकडून करण्यात आलेली बचत, बचत गटांअंतर्गत दिलेले कर्ज व कर्जवसुली विविध बँकेमार्फत मायक्राक्रेडीट व्दारे दिलेले कर्ज व कर्ज वसुली बचत गटातील महिलांना प्राप्त रोजगार याचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण — 6 प्राथमिक तथ्याचे विश्लेषण निर्वचन**

प्रस्तुत प्रकरणात गोंदिया तालुक्यातील ग्रामिण क्षेत्रातील महिलांच्या आर्थिक, सामाजीक व राजकीय सक्षमीकरणांत महिला आर्थिक विकास महामंडळाची भुमिका कितपत सहाय्यभूत ठरली हे माहिती करून घेण्यासाठी महिला बचत गटाचे सभासद असणा—या महिलांची प्रत्यक्ष मुलाखत घेवून तसेच प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राथमीक तथ्याचे संकलन करण्यात आले आहे. प्राप्त केलेल्या प्राथमीक तथ्याचे सारणी व आलेखाच्या माध्यमाने विश्लेषण करून विश्लेषणाच्या आधारे सामग्रीचे निर्वचन करण्यात आले असून गृहित कृत्याची पडताळणी करण्यात आली.

**प्रकरण — 7 निष्कर्ष व शिफारशी**

महिला आर्थिक विकास महामंडळाव्दारे निर्मित बचत गटामुळे महिलांच्या बचत करण्याच्या सवयीत वाढ होवून बचतगटांमार्फत आर्थिक सहायता प्राप्त झाली आहे. सहभागी महिलांना रोजगार प्राप्त होवून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली असून ग्रामिण महिलांचा सहभाग राजकीय क्षेत्रात वाढलेला आहे.

ग्रामिण महिलांचे सबलीकरण करण्यासाठी प्रत्येक महिलांना बचत गटात सहभागी करणे आवश्यक असून त्याकरिता महिलांना प्रोत्साहित करणे बचत गटाचे महत्व पटवून देणे, बचत गट कुटूंबाचा कसा आधार आहे यासंबंधी महिलांमध्ये जागृती निर्माण करणे बचत गटांमार्फत महिलांना आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**Principal Investigator**

**Principal,**
**N. M. D. College, Gondia**

Principal
Natwarlal Manikial Dalal
College of Arts & Commerce
GONDIA Dist. Gondia (M.S.